प्रेस नोट दि.०८/०४/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## मागील २ वर्षापासुन पोलीसांना गुंगारा देणाऱ्या सराईत गुन्हेगाराच्या मुसक्या आवळल्या

सदर बाबत अधिक माहिती अशी की, खडक पोलीस स्टेशन गु.र.नं. २९२/२०१६ भा.दं.वि कलम ३७९ मधील फिर्यादी प्रसाद मनोहर पटवर्धन वय ४७ वर्षे रा.दांगट चाळ वडगांव बुद्रुक पुणे यांनी दिनांक १५/७/२०१६ रोजी १२/०० वा सुमारास त्याची वापरती हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटर सायकल नं एम एच १२ जी डी ४८०८ ही गोटीराम भैय्या चौक प्यासा हॉटेल समोर,शुक्रवार पेठ पुणे येथे पार्क करुन मंडई मध्ये गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने सदरची मोटर सायकल चोरुन नेली होती, त्याप्रमाणे वरील प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

दाखल गुन्हयाचा तपास करीत असतांना, दाखल गुन्हयात चोरीस गेलेली हिरो होंन्डा स्प्लेंडर मोटर सायकल नं. एम एच १२ जी डी ४८०८ ही आरोपी नामे गणेश उत्तम लाड वय २८ वर्षे रा.४२६/२२४४ संत तुकाराम नगर पिंपरी पुणे व पाहिजे आरोपी संदिप तानाजी चव्हाण काळेवाडी पुणे या दोघांनी चोरीली असल्याचे निष्पन्न होते. त्याप्रमाणे आरोपी गणेश उत्तम लाड यास वरील गुन्हयात दिनांक १६/१०/२०१६ रोजी अटक करण्यात आली होती, परंतु आरोपी नामे संदिप तानाजी जाधव हा तेव्हा पासुन आजपर्यंत दाखल गुन्हयात फरार होता.

दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी संदिप तानाजी जाधव रा.काळेवाडी पुणे याचा शोध घेवुन गुन्हयात अटक करणे बाबत मा.वरिष्ठांनी आदेश दिले होते. त्याप्रमाणे खडक पोलीस स्टेशन कडील पोहवा विनोद जाधव व पोकॉ रवि लोखंडे यांना त्याचे बातमीदाराचे बातमी दिली की, आरोपी नामे संदिप तानाजी जाधव हा त्याचे राहते घरी .फ्लॅट नं ४, शिव अपार्टमेंन्ट, नढेनगर काळेवाडी पुणे येथे आहे, त्याप्रमाणे सदरची बातमी वरिष्ठांना सांगुन आरोपीचे राहते पत्त्यावर जावुन शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्याचेकडे दाखल गुन्हयाचे बाबत तपास करता त्याने सदरचा गुन्हा साथीदार गणेश उत्तम लाड याचे सोबत केला असल्याचे कबुली दिल्याने आरोपी नामे संदिप तानाजी जाधव वय ३१ वर्षे .फ्लॅट नं ४, शिव अपार्टमेंन्ट, नढेनगर काळेवाडी पुणे यास दिनांक ६/४/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपी याचे वर यापुर्वी वाकड, दिघी, चर्तुश्रृंगी पोलीस स्टेशन येथे वाहन चोरीचे गुन्हे दाखल असुन त्यास मा.पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ -३ पुणे शहर यांनी सन २०१६ पासुन २ वर्षापर्यंत तडीपार केले होते.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सहा पोलीस निरीक्षक श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विठ्ठल पाटील, विनोद जाधव, संदिप पाटील, सागर सोनवणे, रवी लोखंडे, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर, महावीर दावणे, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.